# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

October 2024 - November 2024 / Issue No. 04 | Price : Rs. 30/-

मतदान दिनांक
20
नोव्हेंबर






उज्वल भविष्यासाठी...
संपूर्ण विकासासाठी...
विकसित भारतासाठी...

**तुमचं मत**
**लाखमोलाच आहे...**

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांची जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या प्रथम अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) नियुक्ती झाल्याबद्दल**

# हार्दिक अभिनंदन



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांची जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या प्रथम अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नाम. एकनाथजी शिंदे यांनी पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला यावेळी राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर उपस्थित होते.





महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांची जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या प्रथम अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्राचे उद्योगमंत्री नाम. उदयजी सामंत व खासदार मान. श्रीकांत शिंदे यांनी पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला यावेळी भरत गांधी, संदिप भंडारी, ॲड. मेघ गांधी उपस्थित होते.

MACCIA 100
GLORIOUS 95 YEARS · MARCHING TOWARDS CENTENARY
Apex Chamber of the State 1927-2027
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE

# महाराष्ट्र चेंबर पत्रिका

October 2024 - November 2024/ Issue No. 4

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर**

ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई- ४००००१
फोन : (०२२) २२८५५८५९/६०
ई-मेल: maccia@maccia.org.in
वेबसाईट : www.maccia.org.in

**संपादकीय समिती**

- अध्यक्ष व संपादक
  **ललित गांधी**
- वरिष्ठ उपाध्यक्ष
  **रविंद्र माणगावे**
- उपाध्यक्ष
  **करूणाकर शेट्टी, शंकर शिंदे, संजय सोनवणे, संगीता पाटील, रमाकांत मालु, दिलीप गुप्ता, प्रफुल मालाणी, श्रीकृष्ण परब**
- सरकार्यवाह : **सुरेश घोरपडे,**
  सहसंपादक : **अविनाश पाठक**

- **उत्तर महाराष्ट्र विभागीय कार्यालय**
  ४९, पाचवा मजला, बिजनेस बे, श्रीहरी कुटे मार्ग, मुंबई नाका, नाशिक - ४२२००१
  फोनः (०२५३)२५७७७०४
- **पूणे जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. ईएल-१५, एमआयडीसी, भोसरी, पूणे - ४११०२६.
- **जळगांव जिल्हा कार्यालय**
  २१-ए,श्रीराम स्टेट बँक कॉलनी, रिंगरोड, जळगाव - ४२५००१
- **कोल्हापूर जिल्हा कार्यालय**
  बिझनेस हाऊस, राजारामपूरी १० वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८
- **बारामती जिल्हा कार्यालय**
  प्लॉट नं. सी–८८, हॉटेल सुर्या जवळ, एमआयडीसी भिंगवान रोड, बारामती, पुणे – ४१३१३३

**इतर कार्यालय** : अंधेरी (मुंबई), नवी मुंबई, ठाणे, पालघर, धुळे, रत्नागिरी, पलुस (सांगली)

**Note :** Articles published in this bulletin do not necessarily reflect the views of the Maharashtra Chamber of Commerce, Industry & Agriculture.

# अंतरंग

१. करप्रक्रियेतील सुलभतेसाठी कर सल्लागार फेडरेशन, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर कार्य करेल - नारायण जैन
२. २ वर्षात ३३ हजार नवउद्योजक : उद्योगमंत्री उदय सामंत
३. जळगाव एमआयडीसीला डी प्लस दर्जा देणार : उद्योगमंत्री उदय सामंत
४. जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचे कोल्हापूरात जल्लोषी स्वागत
५. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांची जैन अल्प संख्याक महामंडळाच्या प्रथम अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल नाशिक येथे सत्कार
६. समाज एकता, धार्मिक सुरक्षा यासह सर्वांगीण विकासासाठी जैन महामंडळ कार्य करील - ललित गांधी
७. उद्योजक व व्यापाऱ्यांसाठी निर्याताची सुवर्णसंधी !
८. निर्यात व्यापार
९. पंतप्रधान ई वाहन मोहिम नवउद्योजकांसाठी मोठी संधी - ललित गांधी
१०. वैश्विक पर्यटन नकाशावर महाराष्ट्राचे स्थान उंचावण्यासाठी महाराष्ट्र चेंबर कटिबध्द




## दिपावली पर्वाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

महाराष्ट्र चेंबर पत्रिकेचा दिवाळी अंक आपल्या हाती देतांना मला विशेष आनंद होत आहे. दिपावली हा सण नवी उमेद, उत्साह आणि चैतन्य घेऊन आपल्या सर्वांच्या आयुष्यामध्ये येतो. एक सळसळते वातावरण आणि नवा उन्मेष सर्वत्र शिगोशिग भरलेला आपण अनुभवत असतो. यानिमित्ताने आपण नवनवीन कल्पनांचाही स्विकार करून आपली वाटचाल अधिक समृध्द व्हावी असे प्रयत्नही करत असतो.

स्थापना काळापासून आपल्या महाराष्ट्र चेंबरने राज्याच्या एकूण विकासाच्या दृष्टीने सातत्याने विचार केला आहे. त्यासाठी वेळोवेळी काळाची पावले ओळखून नवनवीन संकल्पनांचा पाठपुरावाही केला. आवश्यक अशी धोरणे सरकारने अंमलात आणावी यासाठी प्रयत्नही केले आणि त्याची अनेक दृष्य फळे आज आपल्याला दिसून येतात. सध्याचा जागतिक विचाराचा व्यापाराचा आणि व्यवसायाचा काळ लक्षात घेऊन वाटचाल करण्यासाठी आपल्या सर्वांवर मोठी जबाबदारी आहे असे मी मानतो. चेंबरचा शताब्दी महोत्सव काळ म्हणजे पुढील शतकातील साधावयाच्या विकासाची, प्रगतीची एक चैतन्यमय वाट असे मला वाटते. हे वाटणे केवळ आपल्या परंपरेला धरूनच आहे असे नाही तर जागतिक स्तरावरही आपल्या राज्याचे नाव आघाडीवर असले पाहिजे या दृष्टीने केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा हा शुभारंभ असणार आहे. आणि म्हणून यंदाच्या दिवाळीतील ही प्रकाशमय वाट मला सतत खुणावत आहे.

काळाची पावले ओळखून अनेक तरूण तरूणींना स्वतःचा व्यापार, स्वंय रोजगार देणारा उद्योग वगैरे सुरू करण्याची मनिषा असते. प्रस्थापित उद्योजकांनाही आपल्या व्यापार उद्योगाच्या कक्षा रुंदावण्याची महत्वकांक्षा असते. त्याचप्रमाणे या सर्वांसाठी आवश्यक असे कौशल्यही प्राप्त करणे गरजचे असते. आणि म्हणूनच गेल्या वर्षापासून आपण मासिआ बिझनेस नेटवर्किंग फोरम सुरू केल्या असून त्याचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर करण्याचा आपला मनोदय आहे. केवळ महाराष्ट्र चेंबरच्या सदस्यांचा जरी विचार केला तरी एक कोटीहून अधिक व्यापारी, उद्योजकांची एक विशाल बाजारपेठ आपल्याला उपलब्ध आहे हे जाणवते.

कौशल्य विकासाच्या दृष्टीने आपले सरकार समवेत आणि विद्यापीठां समवेत सामंजस्य करारही झाले आहेत. त्यांच्या सहकार्याने महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यामध्ये आणि गरजेनुसार तालुक्यामध्येही आपण कौशल्ये विकास केंद्रे सुरू करण्याचे योजले आहे. अशा रितीने एक अत्यंत महत्वाकांक्षी कार्यक्रम आपण हाती घेतला असून आपल्या सर्वांच्या सहकार्याने येत्या काही वर्षात एक खूप मोठे रचनात्मक कार्य आणि सर्वदूर विकासासाठीचे कार्य उभे राहिल यात शंका नाही. त्यादृष्टीने महाराष्ट्र उद्योग यात्रा आपण सुरू करत आहोत. या यात्रेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर आपण उद्योजकता प्रशिक्षण, कौशल्य विकास प्रशिक्षण, व्यवसायातील आर्थिक साक्षरता, निर्यात विषयक व्यापार संधी, महिला उद्योजकता जागर असे विविध उपक्रम करणार आहोत.

**व्यापाऱ्यांबद्दल अपशब्द बोलणाऱ्या संजय राऊत यांनी माफी न मागितल्यास तीव्र आंदोलन उभारले जाईल - ललित गांधी**



गेल्या नजीकच्या काळामध्ये उद्योग भरारीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्याच्या उद्योगमंत्र्यांसमवेत महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये जाण्याची संधी मला मिळाली. यावेळी व्यापारी व उद्योजकांच्या आवर्जून भेटी झाल्या व चर्चाही करता आल्या. मार्केट ॲक्ट, जीएसटी, औद्योगिक वसाहतीचे प्रश्न, दळण वळण समस्या वगैरेबाबत आपल्या चेंबरचे प्रयत्न सतत चालू आहेत. हे प्रश्न लवकरच मार्गी लागतील असा विश्वास वाटतो. या काळामध्ये नीती आयोगाचे सदस्य डॉ. अरविंद विरमणी यांची भेट ही विशेष महत्वाची होती. त्यामुळे व्यापार, उद्योग संदर्भातील असणाऱ्या विविध धोरणांचा आणि अडचणींचा आढावा घेता आला. त्याचप्रमाणे ओएनडीसीशी झालेल्या सामंजस्य करार हा देखील विशेष महत्वाचा आहे. डायरेक्टर जनरल फॉरेन ट्रेडचे संचालक श्री. संतोषकुमार सारंगी यांच्यासमवेत झालेली बैठकही विशेष महत्वाची होती. त्यामुळे महाराष्ट्रातील निर्यातीच्या अनुशंगाने असणाऱ्या बाबींवर चर्चा करता आली.

शेवटी आपण सर्वांनी मनापासून चेंबरच्या कार्यामध्ये सहभागी व्हावे आणी सातत्याने आपल्या महत्वपूर्ण अशा सुचना चेंबरला कळवत रहाव्यात असे मी आवाहन करत आहे.

आपणा सर्वांना प्रकाशपर्वाच्या हार्दिक शुभेच्छा !

ललित गांधी

**अध्यक्ष**

# करप्रक्रियेतील सुलभतेसाठी कर सल्लागार फेडरेशन, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स बरोबर कार्य करेल - नारायण जैन

## महाराष्ट्र चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते शुभारंभ






◆ राष्ट्रीय कर परिषदेचे दिपप्रज्वलन करून उद्घाटन करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, राष्ट्रीय टॅक्स प्रॅक्टीशनर्स फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण प्रसाद जैन, विनायक पाटकर, महेश माडखोलकर, नरेंद्र सोनवणे, प्रविण शिंदे, माजी राष्ट्रीय अध्यक्ष पी.सी.जोशी, निकिता बधेका, श्रीनिवास राव, समीर जानी, प्रसन्न देशपांडे, दुसऱ्या छायाचित्रात राष्ट्रीय कर परिषदप्रसंगी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

**कोल्हापूर** : करदात्यासाठी कर प्रक्रिया सुलभ असावी यासाठी राष्ट्रीय टॅक्स प्रॅक्टीशनर्स फेडरेशन कार्य करीत असते हे कार्य अधिक प्रभावी होण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर बरोबर सहकार्याने यापुढील वाटचाल गतीने करण्याचा प्रयत्न केला जाईल असे प्रतिपादन फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण प्रसाद जैन यांनी केले.

ऑल इंडिया टॅक्स प्रॅक्टीशनर्स फेडरेशन, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीज व अन्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय कर परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी सन्माननीय अतिथी या नात्याने ते बोलत होते. प्रारंभी कार्यक्रम चे मुख्य अतिथी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी व नारायण प्रसाद जैन यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी आपल्या मनोगतात, राष्ट्रीय स्तरावर टॅक्स प्रॅक्टीशनर्स फेडरशन च्या माध्यमातुन सुरू असलेले कार्य व्यापारी, उद्योजक या प्रमुख करदात्यांसाठी उपयुक्त व आवश्यक अशा प्रकारचे आहे. कर रचनेमध्ये होत असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी कर सल्लागारांची भुमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे.

महाराष्ट्र चेंबर यासाठी फेडरेशन ला आवश्यक ते सहकार्य करण्याबरोबरच विविध विषयांवर एकत्रितपणे काम करेल असे सांगितले. कोल्हापूरमध्ये ही राष्ट्रीय कर परिषद आयोजित केल्याबद्दल फेडरेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायक पाटकर यांना धन्यवाद देवुन देशाच्या विविध राज्यातुन आलेल्या २५० हुन अधिक पदाधिकाऱ्यांचे कोल्हापूर च्या वतीने ललित गांधी यांनी स्वागत केले.

दोन दिवस चालणाऱ्या परिषदेमध्ये पहिल्या दिवशी आयकर कर निर्धारण, आयकराच्या धाडी, जीएसटी, ट्रीब्युनल व्यवस्थेचे कामकाज, जीएसटी चे डिपार्टमेंटल ऑडीट याविषयांवर विविध मान्यवरांचे मार्गदर्शन सत्र संपन्न झाले.

कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या मध्ये महेश माडखोलकर, नरेंद्र सोनवणे, प्रविण शिंदे, अनिल माथुर, माजी राष्ट्रीय अध्यक्ष पी.सी.जोशी, निकिता बधेका, श्रीनिवास राव, समीर जानी, प्रसन्न देशपांडे आदि मान्यवर उपस्थित होते.

परिषदेच्या यशस्वीतेसाठी कोल्हापूर जीएसटी प्रॅक्टीशनर्स असोसिएशन चे अध्यक्ष अरूण बाहेती, कोषाध्यक्ष धिरज शहा व अन्य पदाधिकाऱ्यानी विशेष परिश्रम घेतले.

# २ वर्षात ३३ हजार नवउद्योजक : उद्योगमंत्री उदय सामंत




◆ **महाराष्ट्राची उद्योग भरारी, नाशिक या कार्यक्रमात बोलतांना उद्योगमंत्री उदय सामंत व्यासपीठावर उपस्थित महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, आमदार सीमाताई हिरे, खासदार राजाभाऊ वाजे, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, अजय बोरस्ते.**

**नाशिक** : गेल्या २ वर्षात महाराष्ट्र सरकारने उद्योग विभागामार्फत सुमारे ३२ हजार सातशे नवउद्योजक तयार करण्याचे महत्वाचे काम केले आहे. यात मोठ्या प्रमाणावर तरूणांचा स्टार्टअपचा समावेश केला आहे. एवढेच नाही तर या दोन वर्षात उद्योजकांना सुमारे दहा हजार पाचशे कोटींचे अनुदान वाटप करण्यात आले आहे. तसेच उद्योगस्नेही धोरणामुळे राज्यात सर्वांत जास्त ७५ हजार कोटींची गुंतवणूक आल्याने जगातील गुंतवणूकदार महाराष्ट्र राज्यात आकर्षित होत असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नाशिक येथे आयोजित महाराष्ट्राची उद्योग भरारी या कार्यक्रमात माहिती दिली.

उद्योगमंत्री सावंत पुढे म्हणाले की, राज्य सरकारने उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी घेतलेले निर्णय, उद्योजकांना दिलेल्या उच्च दर्जाच्या सुविधा आणि औद्योगिक वसाहतीत पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक आली आहे. उद्योगस्नेही धोरणामुळे महाराष्ट्र राज्य परकीय गुंतवणूकीत भरारी घेत प्रथम क्रमांकावर असल्याचे उद्योगमंत्री सामंत यांनी सांगितले. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी गेल्या दोन वर्षात राज्याने पुन्हा औद्योगिक क्षेत्रात भरारी घेतली असून राज्य प्रथम क्रमांकावर आले आहे. नवनवीन उद्योग राज्यात येत असून उद्योगांचे सक्षमीकरण होत आहे. नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित होत आहे ही समाधानाची बाब आहे. उद्योजकांना सन्मान मिळवून देण्याचे काम या शासनाने केले आहे. गतिमान व वेगवान सरकार असून व्यापार व उद्योग क्षेत्रांचे प्रश्न उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तात्काळ सोडविले आहेत. उद्योगांचे अनुदान, औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा असो किंवा इतर समस्या उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तात्काळ निर्णय घेऊन मार्गी लावल्या त्याबद्दल राज्याच्या व्यापार उद्योग क्षेत्राच्यावतीने उद्योगमंत्री उदय सामंत व महाराष्ट्र सरकारचे आभार मानले.

याप्रसंगी व्यासपीठावर उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, इन्फ्रास्ट्रक्चर समितीचे चेअरमन कांतीलाल चोपडा, आमदार सीमाताई हिरे, खासदार राजाभाऊ वाजे, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, अजय बोरस्ते, विजय करंजकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सोनाली मुळे, अधिक्षक अभियंता बाळासाहेब झंजे, प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी, उद्योग सहसंचालक शेळके, जिल्हा उद्योग केंद्राचे अतुल दवंगे उपस्थित होते. याप्रसंगी खासदार प्रकाश वाजे, आमदार सीमाताई हिरे, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.





◆ **महाराष्ट्राची उद्योग भरारी, नाशिक या कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन करून उद्घाटन करताना उद्योगमंत्री उदय सामंत दुसऱ्या छायाचित्रात महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यावेळी ललित गांधी यांचा सत्कार करण्यात आला.**

# जळगाव एमआयडीसीला डी प्लस दर्जा देणार : उद्योगमंत्री उदय सामंत

## उद्योग भवनसाठी २३ कोटी तर ट्रक टर्मिनन्ससाठी १३ कोटी मंजूर




**जळगाव :** जळगाव एमआयडीसीचा 'डी'दर्जा उन्नत करून 'डी प्लस' दर्जा तात्काळ देण्यात येणार असून उद्योग भवनसाठी २३ रुपये तर ट्रक टर्मिनन्ससाठी १३ कोटी रुपये मंजूर केले असल्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य केल्याचेही उद्योगमंत्र्यांनी यावेळी सांगितले. छत्रपती संभाजी राजे नाट्यगृह येथे आयोजित खान्देश विभागस्तरीय 'महाराष्ट्राची उद्योग भरारी' या कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, या कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, खा. स्मिता वाघ, आ. सुरेश (राजूमामा) भोळे, आ. किशोर पाटील, आ. लताताई सोनवणे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, उपमुख्यकार्यकारी अधिकारी सोनाली मुळे, मुख्य अभियंता राजेंद्र गावडे, प्रादेशिक अधिकारी, धुळे दिगंबर पारधी, प्रादेशिक अधिकारी, जळगाव सुनील घाटे उपस्थित होते.

जळगाव मध्ये जे उद्योग भवन उभं राहणार आहे, त्यात एमआयडीसीचे प्रादेशिक कार्यालय असावे ही पालकमंत्री यांची मागणी मान्य केली असून दोन दिवसात त्याचा लेखी आदेश निघेल. हे प्रादेशिक कार्यालय आठवड्यातले दोन दिवस जळगाव जिल्ह्यातील उद्योग, उद्योजक यांच्या अडीअडचणी जाणून त्याची सोडवणूक करेल अशी माहिती उद्योगमंत्र्यांनी यावेळी दिली.

चिंचोली व कुसंबे येथे अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र उभारण्यासाठीची प्रक्रिया सुरु करणार असल्याचे सांगून जळगाव जिल्ह्यात चोपडा आणि पाचोरा या दोन तालुक्याला नवीन एमआयडीसी, ९ जळगावला विस्तारीत एमआयडीसीला मंजूरी दिल्याचे सांगितले. त्याच बरोबर आपण उद्योग मंत्री झाल्याबरोबर राज्यात उद्योजकांचे थकलेल्या प्रोत्साहन निधी पोटी २ हजार ४०० कोटी रुपये दिले असून आज पर्यंत जवळपास ३ हजार कोटी पेक्षा अधिकचा प्रोत्साहन निधी दिल्याचे सांगितले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी गेल्या दोन वर्षात राज्याने पुन्हा औद्योगिक क्षेत्रात भरारी घेतली असून राज्य प्रथम क्रमांकावर आले आहे नवनवीन उद्योग राज्याचे येत असून उद्योगांचे सक्षमीकरण होत आहे नवीन औद्योगिक क्षेत्र विकसित होत आहे ही समाधानाची बाब आहे उद्योजकांना सन्मान मिळवून देण्याचे काम या शासनाने केले आहे गतिमान व वेगवान सरकार असून व्यापार उद्योग क्षेत्राचे प्रश्न उद्योग मंत्री उदय सामन्याने तात्काळ सोडविले आहेत उद्योगांचे अनुदान औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा असो किंवा इतर समस्या उद्योग मंत्री उदय सामंत यांनी तात्काळ निर्णय घेऊन मार्गे लावल्या त्याबद्दल राज्याच्या व्यापार उद्योग क्षेत्राच्या वतीने उद्योग मंत्री उदय सामंत महाराष्ट्र सरकारचे आभार मानले.

चोपडा, पाचोरा आणि जळगावला विस्तारित एमआयडीसी दिल्या बद्दल महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फेच्या वतीने उद्योगमंत्र्यांचे आभार मानले. यावेळी स्थानिक उद्योगात चमकदार कामगिरी करणाऱ्या उद्योजकांचा गौरवही करण्यात आला.

# जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांचे कोल्हापूरात जल्लोषी स्वागत

## अध्यक्षपद मिळाल्यानंतर पहिल्यांदाच कोल्हापूरात आगमन











**कोल्हापूर** : महाराष्ट्र सरकारतर्फे जैन समाजाच्या धार्मिक, सामाजिक व आर्थिक विकासासाठी 'जैन अल्पसंख्यक आर्थिक विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले आहे. सदर महामंडळाच्या अध्यक्षपदाचा प्रथम मान हा कोल्हापूरला मिळाला. अखिल भारतीय जैन अल्पसंख्यक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी यांना महामंडळाचे 'प्रथम अध्यक्ष' म्हणून नियुक्ती करण्यात आली.

नियुक्ती झाल्यानंतर ललित गांधी यांचे पहिल्यांदाच कोल्हापूर मध्ये रेल्वे स्टेशन ला आगमन झाले. यावेळी कोल्हापूर जिल्ह्यातील विविध संघटना, जैन समाजातील विविध संघटना यांचे किमान ७०० ते ८०० नागरीकांच्या उपस्थितीत ललित गांधी यांचे फुलांच्या वर्षावात, तुतारी व ढोल ताशांच्या गजरात जल्लोषी स्वागत करण्यात केले.

ललित गांधी हे गेली अनेक वर्ष सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे या कार्याची पोचपावती म्हणून राज्यसरकारने जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या पहिल्या अध्यक्षपदाचा मान ललित गांधी यांना दिला. मंत्री पदाचा दर्जा असलेले पद मिळाल्यामुळे समाजात प्रचंड उत्साह निर्माण झाल्याचे दिसुन येत होता.

स्वागता समारंभावेळी बोलताना ललित गांधी म्हणाले की, सदर पदाचा उपयोग हा महाराष्ट्रामध्ये जैन समाज व त्यांच्या विविध पोटजातीतील आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या जैन समाजातील युवक, महिला व सर्व घटकांना विविध योजनांचा लाभ मिळवुन जैन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी व आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणार आहे असे प्रतिपादन केले.

यावेळी भरत गांधी, सत्यजित कदम, महाराष्ट्र चेंबर चे उपाध्यक्ष रमाकांत मालु, कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष संजय शेठे, धनंजय दुग्गे, गुजरी संघाचे अध्यक्ष नरेंद्र ओसवाल, लक्ष्मीपूरी संघाचे कांतीलाल ओसवाल, भक्तीपुजानगर ट्रस्ट चे अध्यक्ष राजेंद्र ओसवाल, भरत ओसवाल, विजय यादव, प्रशांत पोकळे, जयेश ओसवाल, किशोर राठोड, ऋषभ भंडारी, दिलीप गांधी, प्रदीप जैन, हिरालाल गांधी, हिराचंद खिंवसरा, मेघ गांधी, दर्शन गांधी यांच्यासह कोल्हापूर जिल्ह्यातील येथील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांची जैन अल्प संख्याक महामंडळाच्या प्रथम अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल नाशिक येथे सत्कार






महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांची जैन अल्प संख्याक महामंडळाच्या प्रथम अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल महाराष्ट्र चेंबरचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व विविध व्यापारी – उद्योजक संघटनांच्या पदाधिकारी व प्रतिनिधींनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्यालयात भेट घेऊन ललित गांधी यांचा सत्कार केला.

याप्रसंगी उपाध्यक्ष संजय सोनवणे, उत्तर महाराष्ट्र शाखा को–चेअरमन संजय राठी, माजी उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा, विजय वेदमुथा, जेष्ठ उदयोजक के. आर. बेदमुथा, माजी उपाध्यक्ष सुधाकर देशमुख,कार्यकारणी सदस्य राजाराम सांगळे, सत्यजित महाजन, सचिन शहा, सोनल दगडे, शर्मा, मंदार वाईकर, आर. डी. देशमुख, ललित नहार, सुमेरसिंग काळे, राजेंद्र कोठावदे, हेमंत कांकरिया, प्रशांत जोशी, श्रीकांत पाटील, रवींद्र झोपे, सुरेश चावला, संजय राठी, विजय वेदमूथा, सुमित बोरारतन पडवळ आदींसह कार्यकारी सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

# कोल्हापूर येथे विविध संघटनांच्या वतीने सत्कार





महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांची जैन अल्पसंख्याक महामंडळाच्या प्रथम अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे सत्कार करण्यात आला यावेळी अध्यक्ष संजय शेठे, धनंजय दुग्गे, जयेश ओसवाल, प्रशांत पोकळे, सीमा शहा इ. दुसऱ्या छायाचित्रात दै. पुढारी चे संपादक मान. प्रतापसिंह जाधव यांनी ललित गांधी यांचा सत्कार केला यावेळी उपस्थित नितिन धुत, जयेश ओसवाल आदि मान्यवर.

# समाज एकता, धार्मिक सुरक्षा यासह सर्वांगीण विकासासाठी जैन महामंडळ कार्य करील - ललित गांधी



◆ पत्रकार बैठकीत बोलताना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, सोबत उद्योगपती सुरेश जैन, मेघ गांधी व अमित वोरा

जैन समाजातल्या सर्व पंथांमध्ये एकता स्थापित करून समाजाच्या धार्मिक परंपरांचे तीर्थक्षेत्रांचे साधू संतांचे संरक्षण करण्याबरोबरच समाजातील तरुण महिला शेतकरी यांच्यासह सर्वांच्या सक्षमीकरणासाठी जैन आर्थिक विकास महामंडळ पूर्ण क्षमतेने कार्य करेल अशी माहिती जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली आज कोल्हापूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

जैन समाज हा सामाजिक क्षेत्रात सरकारच्या तिजोरीत कर रूपाने सर्वाधिक भर घालणारा दानशूर समाज म्हणून ओळखला जातो. या समाजाच्या धार्मिक सुरक्षिततेसाठी तसेच समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत सर्व घटकांच्या विकासासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता असल्याने अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून महाराष्ट्र सरकारकडून जैन समाजासाठी चे स्वतंत्र महामंडळ निर्माण करण्याचा निर्णय करून घेतला आहे. या महामंडळाच्या माध्यमातून प्रामुख्याने पुढील कार्य केले जाणार आहेत.

राज्यातील जैन समाजाच्या कल्याण व विकासासाठी काम करणे व त्यांचे सामाजिक सक्षमीकरण करणे, जैन समाजाच्या व्यक्तींना अल्प व्याज दराने स्वयंरोजगाराकरिता कर्ज उपलब्ध करुन देणे, जैन समाजाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पतसाधने, साधनसामुग्री आणि तांत्रिक व व्यवस्थापकीय साधने पुरविणे, जैन समाजासाठी आवश्यक साहित्य आणि सामुग्री यांची निर्मिती, जुळवणी व पुरवठा यासाठी आवश्यक वाटतील अशा सेवा देणे, राज्यातील जैन समाजाच्या कल्याणासाठी योजना सुरु करणे आणि त्यांना चालना देणे व योजनासाठी अहवाल तयार करणे, अतिप्राचीन जैन तीर्थांचे संरक्षण व संवर्धन, अतिप्राचीन जैन ग्रंथांचे संरक्षण संवर्धन व पुर्नलेखन, कायम पायी विहार करणाऱ्या जैन साधू संतांच्या विहारसाठी सुरक्षा, आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या जैन विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्ज व्यवस्था, जैन समाजाच्या विधवा, परित्यक्ता महिलांसाठी विशेष योजना तसेच या महामंडळाच्या रचना करताना या योजना जैन समाजासाठी बनविण्यात आले आहेत.

जैन समाज अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या योजना पुढीलप्रमाणे असतील. २५% बीज भांडवल योजना, रू. १ लक्षपर्यंतची थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा रू. १० लक्ष, गट कर्ज व्याज परतावा योजना रू. १० लक्ष ते ५० लक्ष, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गृह कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांकरीता कर्ज व्याज परतावा योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना, महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजना इ. योजना असणार आहेत. जैन समाज समाजाच्या सर्व क्षेत्रात मग ते शैक्षणिक असेल वैद्यकीय असेल जात पात पंत धर्म विरहित काम करीत असतो. परंतु समाजामधीलच अपेक्षित घटकांच्याकडे बऱ्याच वर्षापासून दुर्लक्ष झाले आहे या उपेक्षित व जरूरत मंद वर्गासाठी स्वतंत्र योजना निर्माण करण्याची गरज होती. या महामंडळाच्या स्थापनेमधून पूर्ण झाली आहे. या महामंडळाच्या माध्यमातून निर्माण केल्या जाणाऱ्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी मधून जैन समाजाच्या सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट साध्य केले जाईल अशी खात्री ललित गांधी यांनी याप्रसंगी व्यक्त केली. या महामंडळाचे मुख्यालय मुंबई येथे असून प्रत्येक जिल्ह्यामध्ये याची कार्यालय स्थापन करण्यात येणार आहेत असेही ललित गांधी यांनी यावेळी सांगितले.




# उद्योजक व व्यापाऱ्यांसाठी निर्याताची सुवर्णसंधी !

भारतीय लघु आणि मध्यम उद्योग (एम एस एम ई) तसेच व्यापारी निर्यातदार बनण्यासाठी जागतिक परिस्थिती आणि भारत सरकारच्या २०४७ च्या दृष्टिकोनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. जागतिक बाजारपेठेत भारतीय उत्पादने आणि सेवांची मागणी वाढत आहे, ज्यामुळे एमएसएमईसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. निर्याताद्वारे, एम एस एम ई, व्यापारी त्यांच्या उत्पादनांना जागतिक स्तरावर स्थान मिळवू शकतात, ज्यामुळे व्यवसायाची वाढ होईल आणि आर्थिक स्थिरता साधता येईल.

भारत सरकार २०४७ पर्यंत आत्मनिर्भर भारताची संकल्पना विकसित करत आहे, ज्यामध्ये एम एस एम ई च्या विकासाला विशेष महत्व दिले जात आहे. निर्याताद्वारे, एम एस एम ई व व्यापारी स्थानिक उद्योगांना जागतिक स्पर्धेत सक्षम बनवू शकतात. याशिवाय, जागतिक स्तरावर उत्पादनांच्या दर्जाची मागणी वाढत असल्याने, एम एस एम ई ना त्यांच्या उत्पादनांची गुणवता सुधारण्याची संधी मिळते.

त्यामुळे, भारताच्या २०४७ च्या दृष्टिकोनात एम एस एम ई च्या निर्यात क्षमतांचा विकास करण्याची गरज आहे, ज्यामुळे देशाची आर्थिक स्थिरता आणि विकास साधता येईल. एम एस एम ई साठी निर्यात म्हणजे एक सुवर्णसंधी आहे, जी त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारात एक स्थान निर्माण करण्यात मदत करेल.

भारताची अर्थव्यवस्था वाढीस लागली आहे आणि निर्यात उद्यो गात देखील मोठा संभाव्य आहे. निर्यातदार बनण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रिया आणि सरकारी अनुदान योजना समजून घेणे महत्त्वाचे आहे. या लेखात, आपण विविध सरकारी योजनांबद्दल माहिती घेणार आहोत ज्या निर्यातदार बनण्यासाठी उपयुक्त ठरतील.

### १. निर्यातदार म्हणजे काय? (What is an Exporter)

निर्यातदार म्हणजे तो व्यक्ती किंवा संस्था जी देशाबाहेर माल किंवा सेवा विकते. निर्यात उद्योगामध्ये सामील होण्याने केवळ व्यवसाय वाढत नाही, तर देशाची आर्थिक स्थिती सुधारणे आणि विदेशी चलन मिळविणे शक्य होते. यामुळे तुमच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवता येते. या प्रक्रियेत, तुमच्यावर विविध आव्हाने येऊ शकतात, ज्यासाठी योग्य माहिती आणि संसाधनांची गरज आहे.

### २. निर्यातदार बनण्याची प्रक्रिया (Process of Becoming an Exporter)

**अ. व्यवसायाची निवड** (Choosing a Business)

आपल्या व्यवसायासाठी योग्य उत्पादन किंवा सेवा निवडा.

हे उत्पादन जागतिक बाजारपेठेत लोकप्रिय आहे का, याचा विचार करा. तुम्हाला कोणत्या उत्पादनात विशेष ज्ञान आहे हे देखील विचारात घ्या. व्यवसायाची निवड करताना तुम्हाला बाजारातील ट्रेंड्स आणि ग्राहकांची आवड लक्षात घेणे आवश्यक आहे.

**आ. बाजार संशोधन** (Market Research)

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी, स्पर्धा, ग्राहकांची आवड आणि इतर महत्त्वाच्या गोष्टींचा अभ्यास करा. तुम्ही कोणत्या देशांमध्ये निर्यात करणार आहात यावर विचार करा. बाजारातील ट्रेंड्स आणि गरजा समजून घेऊन तुम्ही अधिक प्रभावीपणे व्यवसाय वाढवू शकता. या संशोधनामुळे तुम्हाला योग्य निर्णय घेण्यात मदत होईल. इ. निर्यात नोंदणी (Export Registration) आपल्याला निर्यातदार म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी, तुम्हाला किमान एका व्यापार मंत्रालयाकडून नोंदणी प्रमाणपत्र घ्यावे लागेल. हे प्रमाणपत्र तुमच्या व्यवसायाच्या वैधतेसाठी आवश्यक आहे. नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तुम्ही औपचारिकपणे निर्यात व्यवसाय सुरु करू शकता.




## ३. सरकारी अनुदान योजना (Government Subsidy Schemes)

**अ. पायाभूत भांडवली अनुदान योजना** (Capital Subsidy)

Credit Linked Capital Subsidy Scheme (CLCSS): ही योजना छोटे आणि मध्यम उद्यो गांना भांडवली सुलभ करण्यासाठी आहे. सरकार तुम्हाला तुमच्या व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांवर २५% पर्यंत अनुदान देते. यामुळे तुम्हाला आधुनिक उपकरणे खरेदी करणे सोपे होईल. या योजनेचा लाभ घेऊन तुम्ही तुमच्या व्यवसायात नवीन तंत्रज्ञानाचा समावेश करू शकता.

**आ. पहिल्या वेळचा निर्यातदार योजना** (First Time Exporter Scheme)

Market ccess Initiative (MI): या योजनेचा उद्देश पहिल्या वेळचा निर्यालदार बनणाऱ्यांना सहाय्य करणे आहे. यामध्ये तुम्हाला निर्यात प्रक्रियेतील विविध टप्पे समजून घेण्यासाठी प्रशिक्षण मिळते. सरकार तुम्हाला मार्केटिंगच्या दृष्टिकोनातून अनुदान देते. यामुळे तुमच्या व्यवसायाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रवेश मिळवता येतो.

**इ. निर्यात विकास योजना** (Export Development Scheme)

Niryat Bandhu Scheme: या योजनेंतर्गत, निर्यातदारांना तंत्रज्ञान सुधारणा, मार्केटिंग, आणि गुणवत्ता नियंत्रण यासाठी अनुदान दिले जाते. यामुळे तुमच्या उत्पादनाची जागतिक मान्यता वाढू शकते. तुम्हाला निर्यात व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या संसाधनांवर मार्गदर्शन मिळेल. यामध्ये प्रशिक्षण कार्यक्रम आणि कार्यशाळांचा समावेश असतो.

**ई. निर्यात क्रेडिट गारंटी कॉर्पोरेशन** (ECGC)

ECGC Export Credit Insurance: ECGC निर्यातदारांना विविध प्रकारच्या जोखमींचा सामना करण्यात मदत करते. यामध्ये, निर्यातदारांना नॉन–पेमेंट जोखमीवर संरक्षण दिले जाते. यामुळे तुम्हाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सुरक्षिततेची भावना मिळते. जर तुम्हाला गळती झाल्यास आर्थिक नुकसान कमी करण्यास मदत मिळते.

## ४. आंतरराष्ट्रीय सहकार्य योजना (International Cooperation Schemes)

Trade Facilitation Measures : भारत सरकार आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापार वाढविण्यासाठी विविध सहकार्य योजना राबविते. यामध्ये निर्यातदारांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवण्यासाठी आवश्यक माहिती, मार्गदर्शन आणि संसाधने उपलब्ध करून दिली जातात. यामुळे तुम्हाला जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास मदत मिळेल. यात विविध व्यापार संमेलन, कार्यशाळा आणि सल्लागार सेवा समाविष्ट आहेत.

## ५. व्यापार प्रदर्शन (Trade Exhibitions)

India Trade Promotion Organisation (ITPO): सरकार विविध जागतिक व्यापार प्रदर्शनांचे आयोजन करते. यात सहभाग घेतल्याने तुम्हाला तुमच्या उत्पादनाची

जागतिक स्तरावर प्रेझेंटेशन करण्याची संधी मिळते. या प्रदर्शनांमध्ये तुमच्या उत्पादनांचे प्रदर्शन करणे आणि संभाव्य ग्राहकांशी संवाद साधणे यामुळे तुम्हाला मोठ्या संधी मिळू शकतात. हे प्रदर्शन तुमच्या व्यवसायासाठी मोठा व्यावसायिक नेटवर्क निर्माण करण्यात मदत करते.

### ६. व्यापार व कार्यशाळा (Trade and Craft Training)

Export Promotion Councils: या कार्यशाळामध्ये निर्यात प्रक्रियेतील विविध पैलूंवर प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये, निर्यात धोरण, दस्तऐवजीकरण, आणि आंतरराष्ट्रीय कायदे यांचा समावेश आहे. या प्रशिक्षणामुळे तुम्हाला निर्यात प्रक्रियेत अधिक आत्मविश्वास मिळेल. तुम्ही तुमच्या व्यवसायाच्या संदर्भात योग्य निर्णय घेण्यासाठी सज्ज असाल.

### ७. निर्यातासाठी लागणारे दस्तऐवज (Documents Required for Export)

**निर्यातदारांना काही महत्वाचे दस्तऐवज तयार करावे लागतात :** परमिट आणि नोंदणीः निर्यातासाठी आवश्यक असलेली परवाने आणि नोंदणी प्रमाणपत्र.

कमर्शियल इन्वॉइस : ग्राहकास पाठवलेली वाणिज्यिक इन्वॉइस.

पॅकिंग लिस्ट: पॅक केलेल्या मालाची यादी.

शिपिंग डॉक्युमेंट्स : माल पाठवताना आवश्यक असलेले डॉक्युमेंट्स.

### ८. निर्यातासाठीची कार्यपद्धती (Methodology for Export)

**अ. मालाची तयारी** (Product Preparation)

तुमच्या उत्पादनाची गुणवत्ता सुनिश्चित करा. हे सुनिश्चित करा की सर्व मानकांचे पालन केले जाते. त्याचबरोबर, पॅकिंग आणि लेबलिंगचे नियम समजून घ्या. यामुळे तुमच्या उत्पादनाची जागतिक बाजारपेठेत स्वीकार्यता वाढेल.

**आ. विपणन धोरण** (Marketing Strategy)

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपले उत्पादन कसे विकायचे हे ठरवा. डिजिटल मार्केटिंग, सोशल मीडिया, आणि इतर चॅनेलचा वापर करा. तुमच्या उत्पादनाचे फायदे आणि वैशिष्ट्ये प्रभावीपणे दर्शवा. यामुळे तुमच्या उत्पादनाची मागणी वाढण्यास मदत होईल.

**इ. वितरण प्रणाली** (Distribution System)

तुमच्या उत्पादनाचे वितरण कसे केले जाईल हे ठरवा. आंतरराष्ट्रीय शिपिंग कंपन्यांचा वापर करा जेणेकरून तुमचा माल सुरक्षितपणे ग्राहकांपर्यंत पोहोचेल. वितरण व्यवस्थेच्या योजनेत कोठेही अडचण येऊ नये याची काळजी घ्या. यामुळे ग्राहकांचा विश्र्वास वाढतो.

**याशिवाय भारत सरकार च्या निर्यातदारांसाठी खालील काही योजना आहेत**

- **लक्षित बाजार योजना** – Focus Market Scheme (FMS)

**भारतातून वाणिज्यिक निर्यात योजना** – Merchandise Exports from India Scheme (MEIS)

- **भारतातून सेवा निर्यात योजना** – Service Exports from India Scheme (SEIS)
- **व्यापार सुलभता उपाय** – Trade Facilitation Measures
- **कर्तव्य परतफेड योजना** – Duty Drawback Scheme
- **निर्यात विकास निधी** – Export Development Fund
- **एकीकृत वस्त्र उद्योजकता पार्क** (ITPs) - Integrated Textile Parks (ITPs)

लक्ष्यनिर्यातदार बनणे हा एक दीर्घकालीन प्रक्रियेचा भाग आहे, परंतु योग्य माहिती, सरकारी योजनांचा उपयोग आणि सततच्या प्रयत्नांनी तुम्ही यशस्वी होऊ शकता. भारत सरकारच्या विविध अनुदान योजनांचा वापर करून तुम्ही तुमच्या व्यवसायाला जागतिक स्तरावर वाढवू शकता. त्यासाठी तयारी, संकल्पना, आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे. तुम्हाला ही आंतरराष्ट्रीय व्यापार सुरु करायचा असेल तर महाराष्ट्र चेम्बर शी त्वरित संपर्क साधावा.

**दिवाळीच्या शुभेच्छा!**

**श्रीकांत पाटील,**
स्टार्टअप इंडिया मेंटॉर, सनदी अभियंता,
अध्यक्ष, क्लस्टर समिती, महाराष्ट्र चेम्बर ऑफ कॉमर्स
https://shreekantpatilmentor.wordpress.com
संपर्क – msmehelp.nashikgmail.com




पुरातन काळामध्ये भारताचे अनेक परदेशांशी व्यापारी संबंध होते. प्रामुख्याने रेशीम आणि त्यापासून बनवलेली वस्त्रे, मसाल्याचे विविध पदार्थ, रत्ने व आभूषणे आणि तांदूळ, गुळ असे अन्न पदार्थ मोठ्या प्रमाणावर विविध देशांना निर्यात केले जात. मसाल्याच्या पदार्थाचा शोध घेतच युरोपातून अनेक दर्यावादी भारतात आले. पुढे या सर्वांनी आपले बस्तान बसवण्यासाठी प्रयत्न केले. सरतेशेवटी ब्रिटिशांचे राज्य आले. सन १९४७ च्या १५ ऑगस्टला आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा जवळपास दरीद्री अवस्थेम ध्ये आपली गणना होत होती. गेल्या ७५ वर्षांहून अधिकच्या काळामध्ये भारताने केलेली प्रगती कोणीही अचंबा करावी अशी आहे. आज जगामधील ३री अर्थव्यवस्था म्हणून आपण जी वाटचाल करीत आहोत त्या पार्श्र्वभूमीवर आपण निर्यात व्यापार आणि भारत हा विचार करणार आहोत.

## • क्षमता व संधी

सर्वसाधारणपणे देशामध्ये उत्पादित केला जाणारा माल आणि वस्तू व सेवा या जेव्हा विपुलतेने उपलबध्द होत असतात तेव्हा प्रत्येक देशाला निर्यातीचा विचार करावा लागतो. या खेरीज विविध देशांशी होणाऱ्या व्यापार करारांमुळे हि निर्यातीचा उगम, वाढ आणि संधी हे सर्व पुढे येते. एकूण जागतिक निर्यातीचा विचार केला तर त्यामध्ये भारताचा वाटा हा गेली अनेक वर्षे, खासकरून वस्तू व्यापार निर्यातीत, जेमतेम दिड दोन टक्के असा आहे. परंतु अलीकडच्या काळात सेवा क्षेत्रामध्ये आणि खासकरून आयटी क्षेत्रामध्ये भारताची घोडदौड मोठ्या वेगाने सुरु आहे. सेवा क्षेत्रामध्ये भारताची जी एकूण निर्यात आहे त्यापैकी ४७ टक्के वाटा आयटी व कॉम्प्युटर्स या क्षेत्राचा आहे. सन २०२० मध्ये सेवा क्षेत्रात एकूण निर्यात ४९९ अब्ज डॉलर्स इतकी होती. त्यामध्ये सातत्याने १५ टक्के इतकी वाढ होत ती सध्या ६८० अब्ज डॉलर्स इतकी झाली आहे. इतर सेवांचा विचार केल्यास व्यवस्थापन व प्रशासकीय सेवा, मनोरंजन क्षेत्र, पर्यटन क्षेत्र, वाहतूक क्षेत्र, शिक्षण व कौशल्य आणि मजूर क्षेत्र यातूनही मोठ्या प्रमाणावर सेवा निर्यात होत आहे. या मध्ये महत्वाचा भाग असा कि, अगदी अलीकडच्या काळातील कृत्रिम बुद्धिम त्ता या क्षेत्रातूनही सेवा निर्यात होत असून प्रामुख्याने ती जगातील सर्व विकसित देशांना केली जात आहे. भविष्याम ध्ये येऊ घातलेल्या कॉनटम कॉम्प्युटिंगच्या तंत्रज्ञान क्षेत्राचा विचार केल्यास भारतातील सेवा क्षेत्राचा आणि निर्यातीचा विस्तार हा विशेष मोठा असणार आहे.

वस्तू क्षेत्राचा विचार केला तर आपल्या देशातून सर्वाधिक निर्यात होणाऱ्या वस्तुंमध्ये आता अन्न धान्य आणि भरड धान्य हि आली आहेत. भारताच्या सूचनेवरूनच युनोने हे वर्ष भरड धान्य म्हणून जाहीर केल्याचे आपण जाणतो. या भरड धान्याचा संबंध आरोग्य आणि जीवनसत्वे यांच्याशी विशेष आहे. आज आपण सर्वाधिक निर्यात तांदळाची करीत आहोत. पण त्यासोबत गहू, मका, गुळ याचीदेखील निर्यात आपण मोठ्या प्रमाणावर करतो

याशिवाय मसाल्याचे पदार्थ आणि फळफळावळ, गुलाबाची व इतर फुले, भाजीपाला, कांदा अशी कृषी उत्पादने आपण निर्यात करतो. महाराष्ट्राचा विचार केला तर मका, तांदूळ, लाल मिरची, चिंच, हळद, गुळ आदि पदार्थांची निर्यात जशी आपण करतो त्याचप्रमाणे कापूस, वस्त्रे, आंबा, द्राक्षे, डाळिंब, केळी, संत्री, मासळी, दुधाचे पदार्थ, विविध प्रकारची औद्यो गिक उत्पादने यांची निर्यात होते. देशामध्ये निर्यातदार राज्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. महाराष्ट्रातील मुंबई बंदर, जवाहरलाल नेहरू बंदर येथून निर्यात होत असल्यामुळे आणि आता वाढवण येथे अधिक आधुनिक बंदर होऊ घातले असल्याने खूप मोठी सोय इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात झालेली आहे. हवाई वाहतुकीमध्येही मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ, नाशिक येथील एचएएल विमानतळ आणि नव्या मुंबई येथे होऊ घातलेला विमानतळ यामुळे विशेष अशी सोय महाराष्ट्रात आहे.

## • मुख्य निर्यात वस्तू

भारतामधून प्रथमपासून ज्याला पारंपरिक स्वरूपाची निर्यात मानली जाते त्यामध्ये रत्ने व आभूषणे याचा क्रमांक लागतो. या निर्यातीत भारत हा जगामध्ये ५ व्या क्रमांकावर असून एकूण जागतिक रत्ने व आभूषणे निर्मीतीमध्ये भारताचा वाटा ६ टक्के आहे. अमेरिका, हॉगकॉग, अरब देश, स्वित्झर्लंड, इंग्लंड याची मुख्यत्वे निर्यात होते. त्यानंतर हातमाग वस्त्रे, सुती धागा, यंत्रमाग वस्त्रे आणि तयार कपडे आदींचीही मोठी निर्यात होते. संपूर्ण जगामध्ये कापूस निर्मितीमध्ये भारताचा रश क्रमांक आहे. त्यामुळे सुती धागे आणि हातमागाची वस्त्रे यासाठी जगभरातून मागणी असते. तिच गोष्ट यंत्रमाग आणि आधुनिक मशनरीच्या सहाय्याने तयार केली जाणारी वस्त्रे आणि तयार कपडे यांची आहे. सर्वसाधारणपणे इंग्लंड, अमेरिका आणि अरबी देशांना याची मोठी निर्यात होते. प्रतिवर्षी सरासरी ८ ते १० टक्के या दराने सदरहू निर्यातीत वाढ झाल्याचे दिसते.

कातडे आणि कातड्यापासून तयार केल्या जाणाऱ्या विविध वस्तू यासाठी इटली, कोरिया, हॉगकॉग आदी देशांकडून तीव्र स्पर्धा असतानांही भारतामधून या वस्तूंची चांगली निर्यात अमेरिका आणि युरोपमधील देश यांना केली जाते. याव्यतिरिक्त पेट्रोलियम प्रॉडक्ट्स, औषधी द्रव्ये, रासायनिक द्रव्ये, ऑटोमोबाईल वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू आदींचीही मोठ्या प्रमाणावर आपल्या देशातून निर्यात होत असते.

